


इतिहास

# वार्षिक अहवाल

## 2024-25

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

**DINESH KACHKURE**
ASSISTANT PROFESSOR

**VIJAY PANDE**
HEAD & ASSO. PROF.

## मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन

दि. 17 सप्टेंबर 2024 रोजी इतिहास विभागाच्या वतीने मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील इतिहास विभागातील प्रा. डॉ. भास्कर टेकाळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

डॉ. टेकाळे म्हणाले की, निजामाच्या एकूण कारकिर्दीचा आढावा घेत असताना निजामच्या सम्राजाचा इतिहास मांडला. तसेच भारतातील एकूण संस्थानांचा आढावा घेतला. निजामाच्या काळात 565 संस्थाने होती. हैद्राबाद संस्थानाचा आढावा असताना म्हणाले की, धर्म परिवर्तनाच्या माध्यमातून अन्याय होत होता. या अन्यायाला उत्तर म्हणून हा लढा उभा राहिला असे म्हणता येईल. यात शिक्षण, भाषा याच्यासाठीही लढा उभा राहिला. तसेच रझाकार यांच्या दहशतीबाबत विवेचन केले. या रझाकारांच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी प्रत्येक गावागावात वंदे मातरम चळवळ सुरु झाली. व सर्वसामान्य लोकांमध्ये जनजागृती तयार करण्याचे काम सुरु झाले. व हैद्राबाद संस्थान भारतामध्ये विलीन करण्यात यश आले. यात स्वामी रामानंद तीर्थ यांचे कार्य मोलाचे आहे हे विसरता येण्यासारखे नाही. प्रास्ताविक प्रा. विजय पांडे यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.




**मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा. डॉ. भास्कर टेकाळे**

# अतिथी व्याख्यान

महाविद्यालयाच्या वतीने दिनांक 4 सप्टेंबर 2024 रोजी 1:50 वाजता बीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रा. योगेश शिंदे, इतिहास विभाग, राजीव गांधी महाविद्यालय, करमाड जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. आपण या तासिकेमध्ये आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारताचा इतिहास अभ्यासक्रमातील "सिंधू संस्कृती" या घटकावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी एकूण बारा विद्यार्थी उपस्थित होते.

संस्कृतीची व्याप्ती, संस्कृतीचा उगम, उत्क्रम व अस्त, स्थलांच्या अवशेषांची व्याप्ती, सार्वजनिक उपयोगाच्या वास्तू, नगृहे, मोठे मंडप, दुर्ग व धान्याची गुदामे यांशिवाय हडप्पाप्रमाणेचमोहें-जो-दडो येथेही बहुधा मजुरांकरिता चाळी, नागरी संस्कृतीचे स्वरुप, मुद्रांवरील रुपके आणि त्यामागील संभाव्य धार्मिक भावना याविषयी मार्गदर्शन केले. उत्कृष्ट नागरी रचना, मुद्रांचा वापर, लिपीचे ज्ञान, धातुतंत्राची प्रगतअवस्था ह्या सर्वांवरुन सिंधू संस्कृती 'एक प्रगत संस्कृती' ठरली असे मत व्यक्त केले.




अतिथी व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा. योगेश शिंदे व विद्यार्थी

# अतिथी व्याख्यान

आमच्या महाविद्यालयाच्या वतीने दिनांक 18 मार्च 2025 रोजी सकाळी 10:50 वाजता बीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाविद्यालय, वाळूज जि. छत्रपती संभाजीनगर येथील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. युलिसिस भालेराव यांच्या अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या तासिकेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील “वर्धन घराणे” या भागावर  त्यांनी अध्यापन केले.



अध्यापन करतांना प्रा. डॉ. युलिसिस भालेराव

# शैक्षणिक अभ्यास सहल


महाविद्यालयाची इतिहास विभागाची शैक्षणिक अभ्यास सहल शनिवार, दि. 5 ऑक्टोबर 2024 रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील अजिंठा लेणी या जगप्रसिद्ध ऐतिहासिक स्थळी आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी अजिंठा लेणीतील मूर्तिकला, शिल्पकला, चित्रकला, जातककथा, त्यांचे आकलन, लेणीचा कार्यकाळ, लेणीचा शोध, गुप्त, वाकाटक, सातवाहन, राष्ट्रकुट  या विविध राजवंशाच्या कार्यकाळात लेणीचे झालेले काम,  यांचा अभ्यास केला. प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांनी विद्यार्थ्यांना लेणीसंदर्भातील सविस्तर माहिती सांगितली. सहलीस प्रा. डॉ. राजश्री पवार, प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. दिनेश कचकुरे, प्रा. डॉ. सुरेश मुंडे, प्रा. अर्जुन शेजुळ हे उपस्थित होते. या सहलीसाठी विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी 275 रु. खर्च घेण्यात आला. सहलीस एकूण 22 विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



सहलीस उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी, प्राध्यापक



**सहलीस उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी**



शै. सहल 2024-25
अजंठा

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | मो. नं. | पैसे दिल्याची नोंद | स्वाक्षरी |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1 | गायत्री कडुबा चोपडे | 9579671060 | 275 / 25 बाकी | Gayatri |
| 2 | दिपाली सखाराम वाघ | 9860396171 | 275 / 25 बाकी | Dipali |
| 3 | पुजा संतोष डबाळे | 7841857338 | 275 | Pooja |
| 4 | आदिती नारायण वाघ | 9226574502 | 275 | Awagh |
| 5 | तुलसी चंदनसिंग सिहरे | 9623707699 | 275 / 25 बाकी | Tulsi |
| 6 | अरुणा रमेश पेरकर | 8698618863 | 275 / 25 बाकी | [illegible] |
| 7) | फिरदोस पटेल | 9975019494 | 275 | Firdous |
| 8) | आफिया पटेल | 9975019494 | 275 | Firdous |
| 9 | [illegible] | 8010592350 | 200 | |
| 10 | [illegible] | 7028620240 | 275 / 25 बाकी | |
| 11 | [illegible] वाघ | 9834917818 | 275 | Sajid |
| 12) | साक्षी पोफळे | 7028714733 | 275 | Sakshi |
| 13) | पुजा नाईक | 9765148548 | 275 | Pooja |
| 14) | नम्रता नाईक | 9960222993 | 275 | Namrata |
| 15) | साक्षी व्यवहारे | 9960222993. | 275 | साक्षी |
| 16 | [illegible] वाघ | 8080064117 | 275 | [illegible] |
| 17 | जय रविंद काथार | 8999402040 | 275. | [illegible] |
| 18 | सौरभ भगवान रघु | 9169101421 | 275. | Saurabh |
| 19 | अमोल दत्तु शेळके | 7709316631 | 275.- | Amol |
| 20 | रोहित संतोष शरवर | 7599190458 | 275 | Rohit |
| 21 | शिवम शेरकर | 7666450085 | 275 | [illegible] |
| 22 | दत्ता राऊत | 7822892313 | 275 | Datta |

# भित्तीपत्रक

दि. 5 सप्टेंबर 2024 रोजी इतिहास विभागाच्या वतीने विभागप्रमुख प्रा. विजय पांडे व प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विषयाची बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी फिरदोस पटेल व बी. ए. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी संविधान बनकर या विद्यार्थ्यांनी मौर्य साम्राज्य या विषयावर तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. डॉ. दिपक भुसारे, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले, तसेच सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे प्रमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

या भित्तीपत्रकात चंद्रगुप्त मौर्यने चाणक्यांच्या मदतीने नंद घराण्याला हरवून मौर्य साम्राज्याची केलेली स्थापना, मौर्य साम्राज्यातील महत्वाचे शासक - चंद्रगुप्त मौर्य, सम्राट बिंदुसार मौर्य, सम्राट अशोक मौर्य- कलिंगचे युद्ध, सम्राट अशोक यांनी खूप मोठ्या प्रमाणात बौद्ध धर्माच्या विचारांचा केलेला प्रसार, सम्राट दशरथ मौर्य, सम्राट बृहद्रथ मौर्य व त्यांनी केलेले कार्य यांचा आढावा घेण्यात आला.



**भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. डॉ. दिपक भुसारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले**

# भित्तीपत्रक

दि. 18 मार्च 2025 रोजी इतिहास विभागाच्या वतीने विभागप्रमुख प्रा. विजय पांडे व प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विषयाची बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी फिरदोस पटेल व बी. ए. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी संविधान बनकर या विद्यार्थ्यांनी मंदिर शैली या विषयावर तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. डॉ. युलिसिस भालेराव, राजर्षी शाहू महाविद्यालय, वाळूज यांच्या हस्ते करण्यात आले.

या भित्तीपत्रकात भारतातील विविध मंदिर शैली, रचना, मंदिरांचे विविध भाग, स्वरूप यांचा विस्तृत स्वरुपात आढावा घेण्यात आला.



भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. डॉ. युलिसिस भालेराव, विजय पांडे, डॉ. दिनेश कचकुरे

# मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम

## Modi Lipi Certificate Course

14 ऑक्टोबर ते 24 ऑक्टोबर 2024

महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्या सहकार्याने दिनांक 14 ऑक्टोबर 2024 ते 24 ऑक्टोबर 2024 या कालावधीत मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्गाचे आयोजन करण्यात आले. सदरील कोर्ससाठी महाविद्यालयातील एकूण 20 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या कोर्ससाठी अध्यापक म्हणून डॉ. कामाजी डक, पुरातत्त्व विभाग, छत्रपती संभाजीनगर; डॉ. दिनेश कचकुरे, छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. उमेश नवल, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्गाच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले. सकाळी 8.30 ते 10.00 आणि दुपारी 3.30 ते 5.00 या वेळांमध्ये तासिका घेण्यात आल्या.

मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये मोडी लिपीचा इतिहास, मोडी लिपीचे सद्यकालीन महत्व, मोडी लिपीची मुळाक्षरे, जोडाक्षरे, मोडी लिपीचे लेखन आणि वाचन, शब्दसंक्षेप व्यवस्था, पत्रलेखनातील मायने व व्याकरण, विविध कालगणना, संवत्सरे याविषयी विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले. त्या त्या दिवशीचे अध्यापन पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना मोडी लिपीसंबंधी गृहकार्यही देण्यात आले. त्यातून विद्यार्थ्यांचा दररोज सरावही झाला. त्यातूनच त्यांचे प्रॅक्टिकलही घेण्यात आले.

मोडी लिपी अभ्यासक्रम वर्ग सुरू असताना दिनांक 21 ऑक्टोबर 2024 रोजी आमच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सन्माननीय सचिव श्री निवृत्ती गावंडे साहेबांनी तसेच संस्थेचे निमंत्रित सदस्य डॉ. प्रदीप जब्दे सर यांनी सदरील वर्गाला भेट दिली. या भेटीमध्ये त्यांनी सुद्धा डॉ. कामाजी डक डॉ. दिनेश कचकुरे आणि डॉ. उमेश नवल यांना मोडी लिपीसंबंधी विविध प्रश्न विचारले आणि त्यांच्या शंकेचे निरसनही करून घेतले. सदरील वर्गात विद्यार्थ्यांना मोडी लिपी वाचता येत असल्याचे पाहून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनाही विशेष आनंद झाला आणि त्यांनी या कोर्सला शुभेच्छा दिल्या.

मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्गाचा एक भाग म्हणून दिनांक 22 ऑक्टोबर 2024 रोजी प्रवेशित विद्यार्थ्यांना मोडी लिपीची कागदपत्रे प्रत्यक्षात दाखवण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास वस्तूसंग्रहालय येथे शैक्षणिक अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या वस्तूसंग्रहालयामध्ये विद्यार्थ्यांना शिवकालीन मोडी भाषेत असलेली विविध पत्रे दाखवण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी या लिपीचे लेखन, तसेच वळणे या संबंधीच्या निरीक्षण केले. ती पत्रे वाचण्याचा सरावही उपस्थित विद्यार्थ्यांनी केला. यातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात ऐतिहासिक मोडी दस्तऐवज बघण्याचा अनुभव घेता आला, तसेच मोडी दस्तऐवजाचे महत्त्वही त्यांना समजले.

दिनांक 24 ऑक्टोबर 2024 रोजी रोजी मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम अध्यापनाची सांगता झाली. या कोर्सच्या शेवटी सर्व प्रशिक्षणकर्त्यांनी प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांकडून मोडी लिपी संबंधीचे विविध प्रोजेक्ट करून घेतले. 25 ऑक्टोबर 2024 या दिवशी या मोडी लिपी वर्गाचे मूल्यमापन म्हणून शिकवलेल्या सर्व अभ्यासक्रमावर आधारित 40 गुणांची बहुपर्यायी आणि वर्णनात्मक स्वरूपाची परीक्षा घेण्यात आली. प्रवेशित एकूण 20 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. दिनांक 25 ऑक्टोबर 2024 रोजी परीक्षेचा निकाल लागल्यानंतर सहभागी सर्व विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे आयोजन करून महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. सुभाष टकले, इतिहास विभागप्रमुख व या अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा. विजय पांडे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर, नॅकचे समन्वयक डॉ. अश्विन रांजणीकर यांच्या हस्ते मोडी लिपी अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

सदरील कोर्ससाठी विद्यार्थ्यांनी अतिशय हिरीरीने सहभाग नोंदवला. या कोर्समधून विद्यार्थ्यांना मोडी लिपीचा इतिहास आणि त्याचे महत्त्व समजले. मोडी लिपी लिहिण्याचे आणि वाचण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना शिकता आले. जुनी विविध महसुली आणि जातीची नोंद असलेली दुर्मिळ कागदपत्रे भाषांतरीत करून त्यातून रोजगार मिळविणे, असाही अनुकूल दृष्टिकोण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला. हा कोर्स पूर्णपणे निशुल्क स्वरूपात आयोजित करण्यात आला. सदरील कोर्ससाठी इतिहास विभागाचे विभागप्रमुख प्रा. विजय पांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.


22 Oct 2024 at 12:47:25 PM
Aurangabad 431004
MH
India
Dr Babasaheb Ambedkar Marathwada University Campus


श्री संत सावता माळी
ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
पी.एम. उषा (रुसा) अंतर्गत
मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम
(Modi Script Certificate Course)
14 - 24 October 2024


श्री संत सावता माळी
ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
पी.एम.
(रुसा) अंतर्गत
25 Oct 2024 at 12:44:49

## पुस्तके खरेदीसाठी यादी

PM Usha अंतर्गत इतिहास विषयाची पुस्तके खरेदी करण्यासाठी ग्रंथपालांनी मागणी केल्यानुसार इतिहासाची 600 संदर्भ व पाठ्यपुस्तकांची यादी देण्यात आली.

## संग्रहालय- प्रपोझल व भेट

PM Usha अंतर्गत इतिहास विषयाच्या संग्रहालयासाठी 5 लाख रुपयाचे अनुदान मिळावे यासाठी प्राचार्य व IQAC यांच्याकडे सविस्तर प्रस्ताव सादर केला. PM Usha कार्यालयाने महाविद्यालयास मंजूर केलेल्या निधीपैकी संग्रहालयास 5 लाख रुपयाचे अनुदान प्राप्त झाले.

## ऐतिहासिक अवशेषांबाबत पत्रव्यवहार

सहाय्यक संचालक, पुरातत्त्व विभाग, सोनेरी महल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर यांना फुलंब्री गावाजवळील स्मशानभूमी व गेस्ट हाऊस जवळील फुलमस्ता नदीमध्ये मंदिरासंबंधीचे (वितान, द्वारशाखेवरील खांब, इतर खांब) ऐतिहासिक अवशेष तीन वेगवेगळ्या ठिकाणी तीन अवशेष बेवारस अवस्थेत पडून होते. या वस्तूंचे जतन होणे आवश्यक आहे त्यादृष्टीने वस्तूसंग्रहालयात हे तीन अवशेष आणण्याची परवानगी आमच्या महाविद्यालयात आणून ठेवण्याची परवानगी द्यावी यासाठी पत्रव्यवहार केला. परंतु त्यांनी ते स्वतःच्या सोनेरी महाल येथे नेले.

## शिवजयंती

19 फेब्रुवारी 2025 रोजी महाविद्यालयातील सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील मराठीच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी शिवाजी महाराजांचे गुप्तहेर खाते, गनिमी कावा, धर्मसहीष्णू धोरण, तत्कालिन काळातील अराजकता यावर प्रकाश टाकून त्यांच्या दूरदृष्टी धोरणामुळे आजचा महाराष्ट्र आपणास वेगळा पहावयास मिळतो असे प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिरदोस पटेल हिने केले तर आभार प्रदर्शन संविधान बनकर याने केले.



# राष्ट्रीय परिषद

## इतिहास बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद

**Multidisciplinary National Conference**

## भारताचा इतिहास, राजकारण, समाज व संस्कृती

**History, Polity, Society and Culture of India**

## 28 फेब्रु. व 1 मार्च 2025

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर अजिंठा शिक्षण संस्थेचे पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर आणि मित्रसाधना शिक्षण प्रसारक मंडळाचे राजर्षी शाहू कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय पाथ्री ता या तीन महाविद्यालयांच्या इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमाने व प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएमउषा) यांच्या प्रायोजकातून "भारताचा इतिहास, राजकारण, समाज व संस्कृती" या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. 28 फेब्रुवारी व 1 मार्च 2025 रोजी करण्यात आले.

## दिवस पहिला

**28 फेब्रुवारी 2025**

### नोंदणी : 9:00 ते 10:00

सकाळी 9 ते 10 या कालावधीमध्ये आलेल्या सहभागींची नोंदणी करण्यात आली.

### उद्घाटन सत्र : 10:30 ते 12:00

**दिनांक** 28 **फेब्रुवारी** 2025 **रोजी** या राष्ट्रीय परिषदेचे उदघाटन डॉ. शरद हेबाळकर (निवृत्त प्रोफेसर आणि माजी सचिव, इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय मुन उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव श्री निवृत्ती गावंडे उपस्थित होते. परिषदेचे प्रास्ताविकपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले. तर परिषदेची भूमिका इतिहास विभागप्रमुख प्रा. विजय पांडे यांनी मांडली. सदर परिषदेसाठी आलेले 162

संशोधन पेपर **Power of Knowledge** या आंतरराष्ट्रीय पियर रिव्ह्यू जर्नलमध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असतांना डॉ. मुन म्हणाले की, भगवान बुद्धांच्या जन्माची नोंद हीच आपल्या देशाच्या इतिहासाची पहिली नोंद आहे. या देशाचा इतिहास नैसर्गिक तत्वज्ञानाचा इतिहास आहे. याची मांडणी येथील अभ्यासक, संशोधक करताना दिसतात. या सर्व बाबीचा प्रवर्तक हा शिक्षक आहे. म्हणून इतिहासाची नोंद आणि सामाजिक संस्कृती याचे काम व्यवस्थित होणे अपेक्षित आहे.

प्रस्तुत परिषदेचे उद्घाटक व बीजभाषक म्हणून बोलताना डॉ. शरद हेबाळकर म्हणाले की, समाजाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची जबाबदारी शिक्षक म्हणून आपल्यावर असते. कारण शिक्षक कधी वाकत नाही, थकत नाही आणि विकतही नाही. अध्यात्मिक ग्रंथाचे संदर्भ देत इतिहासाची मांडणी करत असतांना हेबाळकर म्हणाले की, भारताचा इतिहास हा संघर्षाचा राहिलेला आहे. परंतु आपण दुसऱ्याचे गुलाम कसे होतो हे आपल्या मनावर ठसवले गेले आहे. म्हणजे खरा इतिहास आपल्यापर्यंत अद्याप आलेला नाही. कारण इतिहासात झालेली आक्रमणे ही देशावर नसून ती माणसांवर होती, हे आपण लक्षात घ्यावे. पुढे ते असेही म्हणाले की, आपण इतिहास कशासाठी शिकायचा, त्यातून काय घ्यायचे? यासाठी इतिहासाची पुनर्रचना करावी लागेल, असे मत व्यक्त केले. आपल्याकडे एखाद्या गोष्टीचा उहापोह झाला तरच त्यावेळी राष्ट्राचं किंवा समाजाचं हित तपासलं जातं अन्यथा नाही. आपणांस परंपरा आणि संप्रदाय यांची नीट मांडणी करून त्याचा निष्कर्ष समाजापर्यंत पोहचवावा लागेल, तरच खरा इतिहास समोर येईल. परंतु असे होताना दिसून येत नाही. इतिहासावर राजकीय आणि सामाजिक परिणाम होत असतो. त्यामुळे इतिहासातील संशोधन व्यवस्थितपणे होताना दिसत नाही. ते नव्याने करावे लागेल. तसेच इतिहासात प्रत्येक बाबींचं अपडेटिंग कसे होईल याचा विचार व्हायला हवा, याप्रकारे इतिहासाची व्याप्ती आणि मर्यादा मांडली.

उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव श्री निवृत्ती गावंडे यांनी केला. भूतकालीन ऐतिहासिक घटनामधून वर्तमानात आपण शिकले पाहिजे. म्हणजेच इतिहासातून आपण बोध घेतला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या अध्यक्षीय सामारोपात केले. तर उदघाट्न सत्रासाठी उपस्थित मान्यवरांचे आभार पंडित नेहरू महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. सर्जेराव बनसोडे यांनी मानले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचलन समाजशास्त्र विभागप्रमुख प्रो. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले.

## परिसंवाद सत्र : 12:00 ते 1:30

परिषदेच्या दुसऱ्या परिसंवाद सत्रात स्वामी विवेकानंद स्टडी सेंटर, शासकीय महिला महाविद्यालय, बदलापूर, उत्तर प्रदेश येथील इतिहास विभागप्रमुख डॉ. किशोर कुमार यांनी ऑनलाइन स्वरूपात उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. किशोर कुमार यांनी भारताचा इतिहास, संस्कृती,

लोकशाही व मूल्य प्राचीन शिक्षणव्यवस्था, विविध आव्हाने, नवइतिहास, संशोधनातील दृष्टी याअनुषंगाने विवेचन केले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील इतिहास विभागप्रमुख डॉ. राजेश करपे यांनी केला. मान्यवरांचे आभार आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं.)चे डॉ. विनोद बोरसे यांनी मानले. तर या सत्राचा अहवाल कला महाविद्यालय, बिडकीन येथील इतिहास विभागप्रमुख डॉ. सय्यद मुजीब सर यांनी सादर केला.

## तांत्रिक / पेपरवाचन सत्र पहिले: 2:30 ते 4:00

पहिल्या पेपरवाचन सत्रात संशोधक, अभ्यासकांनी संशोधन पेपरचे वाचन केले. याप्रसंगी या सत्राचे सत्राध्यक्ष म्हणून मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन येथील प्रो. डॉ. प्रभाकर मिरकड, या सत्राचे समन्वयक म्हणून संत तुकाराम महाविद्यालय, कन्नड येथील विभागप्रमुख डॉ. शरद गावंडे हे होते. वैद्यनाथ महाविद्यालय, परळी वैजनाथ येथील विभागप्रमुख डॉ. बाबासाहेब शेप व राजर्षी शाहू महाविद्यालय, वाळूज येथील विभागप्रमुख डॉ. युलिसिस भालेराव यांनी अहवाललेखक म्हणून या सत्रात वाचन केलेल्या 16 पेपरचा आढावा घेतला आणि उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## तांत्रिक / पेपरवाचन सत्र दुसरे: 4:00 ते 5:30

दुसऱ्या पेपरवाचन सत्रात संशोधक, अभ्यासकांनी संशोधन पेपरचे वाचन केले. यावेळी सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा येथील इतिहास विभागप्रमुख प्रो. डॉ. शारदा बंडे या सत्राच्या सत्राध्यक्ष म्हणून, विवेकानंद महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथील इतिहास विभागप्रमुख प्रो. डॉ. त्र्यंबक पाटील समन्वयक म्हणून हे उपस्थित राहिले. प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील इतिहासाच्या प्राध्यापिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी अहवाललेखक म्हणून या सत्रात वाचन केलेल्या 12 पेपरचा आढावा घेतला.

## दिवस दुसरा

### 1 मार्च 2025

## तांत्रिक /आभासी (Online) पेपरवाचन सत्र तिसरे: 1:30 ते 12:00

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी दिनांक 1 **मार्च** 2025 **रोजी,** सकाळच्या पहिल्या सत्रात प्रत्यक्ष आणि आभासी पद्धतीने संशोधन पेपरचे वाचन अभ्यासक, संशोधकांनी केले. यावेळी सत्राध्यक्ष म्हणून शिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा येथील इतिहास विभागप्रमुख डॉ. राहुल दखणे व डॉ. विनोदकुमार सिन्हा, इतिहास विभाग, सरकारी महाविद्यालय बोमडिला, पश्चिम कामेंग, अरुणाचल प्रदेश हे होते. तर समन्वयक म्हणून शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील विभागप्रमुख

डॉ. जगदीश भेलोंडे, तर अहवाललेखक म्हणून मौलाना आझाद महाविद्यालयाचे डॉ. मुसाक शेख उपस्थित होते. या सत्रात जवळपास 13 संशोधन पेपरचे पेपरचे वाचन करण्यात आले.

## परिसंवाद सत्र : 12:00 ते 1:30

परिसंवाद सत्रात इतिहास प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष, डॉ. रवींद्र पाटील यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज आणि साहित्य' या विषयावर विचार मांडताना शिवाजी महाराजांच्या काळातील विविध साहित्याच्या अनुषंगाने प्रतिपादन केले. तसेच शिवकाळाच्या अनुषंगाने अतिशय नावीन्यपूर्ण पद्धतीने मांडणी केली. त्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी कमी लांबी व कमी उंची असणाऱ्या हत्यारांचा वापर केला, यामागे महाराजांचा धोरणात्मक दृष्टीकोन होता. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ३६ प्रकारचे खेळ होते, याबद्दल माहिती दिली. शिवकालीन विविध घटना प्रसंगांचा आढावा घेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील खरी साधने आपल्याला समाजापुढे आणता येतील का? असा विचार उपास्थितांपुढे ठेवला. या परिसंवाद सत्राचा अध्यक्षीय समारोप बी. जे. एस. महाविद्यालय, पुणे येथील इतिहास विभागप्रमुख प्रो. डॉ. भूषण फडतरे यांनी केला. याप्रसंगी प्रो. डॉ. शिरीष पवार, प्रो. डॉ. त्र्यंबक पाटील यांची उपस्थिती होती. अहवाललेखक म्हणून प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील इतिहासाचे प्राध्यापक डॉ. अमोल म्हस्के उपस्थित होते.

## समारोप सत्र : 2:30 ते 4:30

परिषदेच्या समारोप सत्रात साधनव्यक्ती म्हणून इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोडचे उपप्राचार्य तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्यंकटेश लांब यांनी इतिहास विषयातील संशोधनाच्या विविध पद्धती, विषय निवड व इतिहास विषयातील नवे प्रश्न तसेच विषय निवडीत वैविध्यता असायला हवी, संशोधनाचा समाजाला फायदा झाला पाहिजे, या अनुषंगाने विचार मांडले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून चिस्तिया महाविद्यालय, खुलताबाद येथील इतिहास विभागप्रमुख व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो. डॉ. हरी जमाले व राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्रीचे प्राचार्य डॉ. सुनिल मिरगणे, प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

परिषदेच्या या समारोप सत्रात यावेळी उत्कृष्ट शोधनिबंध वाचनासाठीचे पारितोषिके देण्यात आली. डॉ. दिनेश कचकुरे यांनी या पुरस्काराचे वाचन केले. संशोधक गटातून डॉ. किर्ती सांगोळे, शशीकुमार सिरसाठ, न्यूयार्क येथील आर्किटेक्चर केविन श्यामसिंग क्षेत्री यांना तर अध्यापक गटातून डॉ. मुसा शेख यांना उत्कृष्ट शोध निबंध वाचन पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी नांदेड येथील संशोधकदृष्टी असलेले आणि ऐतिहासिक अवशेषांचे संग्राहक श्री दिपक काळे यांना सन्मानित करून त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव करण्यात आला.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. सुनिल मिरगणे यांनी केला. तर दोन दिवस उपस्थित सर्व मान्यवर, अभ्यासक, संशोधक यांचे आभार प्रा. विजय पांडे यांनी मानले. सूत्रसंचलन प्रो. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले. या परिषदेसाठी समन्वयक म्हणून प्रा. विजय पांडे यांनी तर सहसमन्वयक म्हणून डॉ. सर्जेराव बनसोडे, डॉ. गोविंद फड, डॉ. केशव लहाने, डॉ. दिनेश कचकुरे यांनी परिश्रम घेतले. विविध विद्यापीठातील, महाविद्यालयातील एकूण 162 प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक परिषदेत सहभागी झाले.

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय व राजर्षी शाहू महाविद्यालय या महाविद्यालयातील प्राध्यापकांसह जवळपास 200 जणांनी या परिषदेत सहभाग घेतला.

